# बृहन्मुंबईमहानगरपालिका

शेठव्ही.सी.गांधीआणिएम.ए.व्होरामहानगरपालिकासर्वसाधारणरूग्णालय, राजावाडी, घाटकोपर (पू.), मुंबई – ४०००७७.

---

**क्र. एचओ/आरजीएच/ २०५४३ /आस्था - ०१दिनांक११/१२/२०२३**

# सूचना

राजावाडी रूग्णालयाच्या आस्थापनेवरील रिक्त प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गाची पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता खालील अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- **भरावयाची एकूण पदे** :- **०४**
- **मानधन** :- **रू.१८,०००/-**
- **शैक्षणिक अर्हता** :- **१)बी.एस.सी(मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी** MSBTE)<br>**२)डी.एम.एल.टी /पी.जी.डी.एम.एल.टी**
- **अर्ज करण्याचा कालावधी** :- **दि.११.१२.२०२३ ते दि.१५.१२.२०२३.**
- **मुलाखतीची दिनांक** :- **दि.२०.१२.२०२३ वेळ सकाळी – ११:३०**

अर्जदारांनी अर्ज **दि.११.१२.२०२३ ते दि.१५.१२.२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत राजावाडी रूग्णालय, घाटकोपर (पूर्व) येथे सादर करावयाचे आहेत. सदर दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत वमुलाखतीस मूळ प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक याची नोंद घ्यावी. (**अर्जा सोबतची कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत.**)

सदर नियुक्ती **निव्वळ कंत्राटी तत्वावर सहा महिन्यांच्या** कालावधीकरिता अथवा सदर पदांवर कायम तत्वावर उमेदवार प्राप्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी असेल. त्यांना महानगरपालिका कर्मचा-याप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

**अटी व शर्ती** सोबत जोडल्या आहेत.

सही/-

**वैद्यकीय अधिक्षक**

**राजावाडी रूग्णालय, घाटकोपर**

**<u>राजावाडी रुग्णालयाच्या आस्थापनेवरील रिक्त प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदे कंत्राटीपध्दतीने भरण्याबाबत</u>**

**अर्हता –**

- उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBTE) ची /डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा.(B.Sc. + D.M.L.T.)
- उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परिक्षा व तत्सम परिक्षा किमान १०० गुणांची प्रश्नपत्रीका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
- उमेदवारास संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**कर्तव्य –**

- रूग्णाचे रक्त, लघवी, संडास इत्यादी नमुने जमा करणे.
- रक्ताच्या वेगवेगळ्या प्रकारच्या चाचण्या / तपास करणे तसेच प्रयोगशाळेतील इतर नित्य कामे करणे.
- स्वतः केलेल्या रक्त नमुन्याच्या तपासाला जसे रक्तगट तपास व त्याची इतर जुळवणी इत्यादींना जबाबदार राहणे.
- प्रयोगशाळेतील कामी येणा-या साधनसामग्री व उपकरणांची मागणी नोंदवही तसेच त्यासाठी लागणारी पक्की खतावणी तयार करणे.
- स्वाधीन केलेल्या उपकरणांची योग्य ती काळजी घेणे / देखभाल करणे.
- रोजच्या रोज केल्या जाणा-या तपासणीसाठी नोंदणी पुस्तक तयार करणे व त्यांची योग्य ती नोंद ठेवणे.
- प्रयोगशाळेतील काम करणा-या प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा मदतनीस व नोकर वर्ग यांच्या कामावर देखरेख ठेवणे.
- वरिष्ठांनी आदेश दिल्याप्रमाणे प्रयोगशाळेशी निगडीत इतर कामे करणे.

प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत सूचना फलकावर जाहिरात देऊन निवड प्रक्रियेद्वारे निव्वळ कंत्राटी तत्वावर खालील अटी व शर्ती सापेक्ष भरण्याचे प्रस्तावीत आहे.

**निवडीचे निकष –**

- शैक्षणीक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.
- संबंधित विषयातील आवश्यक ती पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवरास अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

**अटी व शर्ती**

- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.
- कराराच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीवरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करावे लागेल.
- प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना प्रति माहे रू.१८,०००/- प्रति महिना मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.
- तसेच सदर पदे विश्ष्टि कालावधीसाठीच असून सदर पद कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल.
- नेमणुकीच्या विहित कालावधीत विवक्षीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची राहील.
- कराराच्या कालावधीत संबंधित प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीमधील नियम लागू राहणार नाही. ही नेमणूक निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असेल.
- कंत्राट पध्दतीचे काम करणा-या प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे काम कराराच्या कालावधीमध्ये जर असामाधानकारक असेल तर अशा प्रयोगशाळा तंत्रज्ञांची कंत्राट पध्दतीवरील नियुक्ती, कोणतीही पूर्व सुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.
- निवड प्रक्रीया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची कंत्राटी नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
- निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूकत्र् नियम १९९९ लागू होणार नाहीत.
- सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त ६ महिन्याचा राहील. (प्रत्येकी ४५ दिवसानंतर १ दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.)
- कंत्राट कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात

येणार नाही. तसेच त्यांची सेवा त्यांना पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

- **<u>उमेदवरांनी अर्ज करावयाचे ठिकाण</u>**
- वैद्यकीय अधिक्षक,
- राजावाडी रूग्णालय, घाटकोपर
- घाटकोपर, मुबई – ४०० ००७.